# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 18/03/2021 (गुरूवार)
(दुपार)

---

### अपघातात मृत्यु

1) पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत 14 कि.मी. अंतरावरील पाटणसावंगी येथे दिनांक 18/03/2021 चे 05:00 वा. दरम्यान एम.पी–30/पी– 0682 क्रमांकाची ट्रव्हल्स बसचा चालक आरोपी नामे– रवि फुलसिंग मालवीय, वय 35 वर्ष, रा. पिपला देवास छिंदवाडा, मध्य प्रदेश (मयत) याने आपले वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन एम.पी– 28/जी– 6666 क्रमांकाच्या आयसर गाडीला मागुन धडक दिली. या अपघातात आरोपी हा स्वताचे मरणास व आयसर गाडीतील दोन मृतक नामे क्र. 1) धनराज बलराम चौरीया, वय 65 वर्ष, रा. मोहखेड जि.छिंदवाडा व 2) शिवराम रामाधार चौरीया, वय 60 वर्ष, दोन्ही रा. मोहखेड जि.छिंदवाडा यांचे मरणास तसेच जखमी क्र. 1) गोलु मोहती वय 24 वर्ष, 2) एस.के.सलमान वय 25 वर्ष, 3) रामबाबु अहिरवाल वय 29 वर्ष, .4) देवेन्द्र शाहु वय 30 वर्ष, 5) अनुराग यादव वय 27 वर्ष व 6) संदीप शाहु वय 30 वर्ष यांना जखमी होण्यास आरोपी मृतक वाहन चालक हा कारणीभुत ठरला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– मनराज बलराम चौरीया वय 60 वर्षे रा. पारतलाई उभेगाव छिंदवाडा म.प्र. यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 337, 338, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि निशांत फुलेकर मो.नं. 7588564300 हे करीत आहे.

2) पो.स्टे. बोरी :– अंतर्गत 06 कि.मी. अंतरावरील डिव्हाईन हॉटेल बोथली येथे दिनांक 16/03/2021 चे 22:00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– प्राण प्रेमलाल पटले, वय 49 वर्ष, रा. वाघधरा तह.हिंगणा, नागपुर हे डिव्हाईड फॅमीली रेस्टारेन्ट येथे सेक्युरीटी गार्ड चे काम करतात. फिर्यादी हे गार्ड डयुटीवर हजर असतांना त्यांना रेस्टारेन्ट समोर अपघात झाल्याचा आवाज आला. त्यांनी त्या ठिकाणी जावुन पाहीले असता एक अनोळखी ईसम यास अज्ञात वाहनाचे चालकाने आपले ताब्यातील वाहन निष्काळजीपणे चालवुन धडक मारून दिली. या अपघात अनोळखी ईसमाच्या मरणास अज्ञात आरोपी चालक कारणीभुत ठरला. या ठिकाणी फिर्यादी यांनी जावुन पाहीले असता सदर अपघात मरण पावलेला ईसम हा वेडसर असुन त्याच परीसरात फिरत होता अशा फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून सदर गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. बोरी येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोहवा असलम नौरंगाबादे 8668816049 हे करीत आहे.

3) पो.स्टे. भिवापुर :– अंतर्गत 01 कि.मी. अंतरावरील पो.स्टे. टी पॉईंट भिवापुर येथे दिनांक 17/03/2021 चे 00:45 वा. दरम्यान फिर्यादींचे वडील नामे– संपत विठु धारगावे, वय 88 वर्ष, रा. टाका ता. भिवापुर हे सकाळी 11.00 वा. सुमारास टाका ते भिसी रोडनी पायदळ जात होते. त्या दरम्यान भिसी कडुन टाका गावाकडे येणाऱ्या रोडने एम.एच–34/ एक्स– 9562 क्रमांकाच्या मोटरसायकलचा चालक आरोपी नामे– आषिश राजु गेडाम, रा. टाका ता भिवापुर याने आपले मोटरसायकल भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचे वडील विठु धारगावे यांना धडक मारून अपघात केला व उपचारादरम्यान मृत्यु झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– रामकृष्ण संपत धारगावे, वय 55 वर्ष, रा. टाका ता. भिवापुर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. भिवापुर येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनी शरद भस्मे 9764946808 हे करीत आहे.

4) पो.स्टे. देवलापार :– अंतर्गत 08 कि.मी. अंतरावरील पवनी ते हिवरा बाजार रोड खरपडा शिवार येथे दिनांक 10/03/2021 चे 15:30 वा. ते 16.00 वा. दरम्यान एम.एच–40/बीझेड– 6524 क्रमांकाचा होन्डा कंपनीची युनिवर्सचा चालक आरोपी नामे– रमेश उर्फ सोनू गजानन बुरले, वय 25 वर्ष, रा. चोरबाहुली हा त्याचे ताब्यातील मोटरसायकलवर ट्रिपल सीट बसवून पवनी कडून हिवराबाजार कडे जात होता. दरम्यान मौजा खरपडा शिवारात आरोपीने त्याचे ताब्यातील मोटरसायकल रॉगसाईडने ट्रिपल सीट बसवून भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवून त्याचे विरुद्ध दिशेने येणा–या सायकलस्वार नामे– चरणदास नामदेव पाटील, वय 55 वर्ष, रा. सावंगी यांना समोरुन धडक दिली. या अपघातात सायकलस्वार यांचे डोक्याला जबर मार लागल्याने सायकल स्वार हे उपचारा दरम्यान मेयो हॉस्पीटल नागपूर येथे दि. 14/03/2021 रोजी 19.30 वा. मरण पावले. पो. स्टे. देवलापार येथे कागदपत्र प्राप्त झाल्यावरुन सदर सायकलस्वार याचे मरणास एम.एच–40/बीझेड– 6524 क्रमांकाच्या मोटरसायकलचा चालक हा कारणीभूत ठरल्याने चौकशी अहवाला वरुन निष्पन्न झाल्याने सदर गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी सरतर्फे पोहवा अशोक उईके पो.स्टे. देवलापार यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. देवलापार येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 337, 304 (अ) भादंवी. सहकलम 184, 128, 177 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास परी मपोउपनी घोडके मो.क्र. 8830614950 या करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर